सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

## सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे

## ग्रामपंचायत – **शिंदेवाडी**, तालुका – **भोर**,
## जिल्हा – **पुणे.**

## लेखा परीक्षण अहवाल सन – **2020-2021**

प्रेषक:

सहाय्यक संचालक,

स्थानिक निधी लेखा परीक्षा, पुणे

परिच्छेद क्रमांक 1 ते 30.

पृष्ठ क्रमांक 1 ते 41.

Scanned with CamScanner

# ग्रामपंचायत : शिंदेवाडी, तालुका : भोर, जिल्हा : पुणे.

## लेखा परिक्षण अहवाल सन 2020-2021

जाक्र-स्था-4/ब-1/ग्रापलेपअ/पुणे/ 968

सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखा परिक्षा, पुणे
दिनांक :- 28/09/2022

प्रति,
मा.सरपंच,
ग्रामपंचायत : शिंदेवाडी,
तालुका : भोर,
जिल्हा - पुणे

महोदय / महोदया,

ग्रामपंचायत शिंदेवाडी, तालुका भोर, जिल्हा पुणेचे सन 2020-2021 या कालावधीचे लेखापरीक्षण श्री. एन.डी.कुलकर्णी, कनिष्ठ लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कार्यालय पुणे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 140 (1) अन्वये दिनांक 13/05/2022 ते 14/05/2022 या कालावधीत पुर्ण केले आहे.

लेखापरीक्षण कालावधीत ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी म्हणुन खालील व्यक्ती कार्यरत होत्या.

| अ.क्र | पदनाम | नाव | कालावधी |
|---|---|---|---|
| | सरपंच | सौ.शोभा अशोक गोसावी | 01/04/2020 ते 22/08/2020 |
| | प्रशासक | श्री.आर.व्ही.चांदगुडे | 23/08/2020 ते 09/02/2021 |
| | सरपंच | श्री.अरविंद पंढरीनाथ शिंदे | 10/02/2021 ते 31/03/2021 |
| | | | |
| | ग्रामसेवक | श्री.डी.आर.सुरवसे | 01/04/2020 ते 31/03/2021 |

Scanned with CamScanner

## भाग-एक

## मागील लेखापरीक्षण

**<u>महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम 1961 मधील नियम क्र.18 (1) प्रमाणे</u>**

ग्रामपंचायतीचे मागील लेखा परीक्षण सन 2019-20 अखेर पर्यत करणेत आलेलेआहे. ग्रामपंचायत लेखासंहिता सन 2011 मधील नियम 73(3) व नमुना 30 नुसार ग्रामपंचायतीने लेखापरीक्षण आक्षेप पूर्तता नोंदवही अदययावत ठेवणे आवश्यक आहे. परंतू ग्रामपंचायतीने सदर नोंदवही अद्यावत ठेवलेली नाही.

मागील लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबीत परिच्छेदांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 140 (2) (3) व (4) अन्वये लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासुन 3 महिन्याच्या आत ग्रामपंचायतीने अहवालातील परिच्छेदांची पुर्तता करावयाची आहे. प्रलंबित सर्व परिच्छेदांचे अनुपालन / पुर्तता करून पंचायत समितीमार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे यांची अंतिम मान्यता घ्यावी व अनुपालन मान्य झाल्या बरोबर त्याच्या प्रतींसह सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे यांना कळवावे. तोपर्यत मागील प्रलंबित परिच्छेद कायम समजण्यात येत आहेत.

खालील तक्त्यानुसार प्रलंबित परिच्छेदांची संख्या खूप मोठी असून ग्रामपंचायतीने लेखापरीक्षा आक्षेपांचे अनुपालन वेळीच करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | लेखा परीक्षण वर्ष | एकुण प्रलंबीत परिच्छेद | पुर्तता केलेल्या परिच्छेदांची संख्या | मंजुर केलेले परिच्छेद | मंजुरी पत्र क्र. व दि. | थकित परिच्छेदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2012-2013<br>2013-2014 | 35 | 0 | 0 | -- | 35 |
| 2 | 2014-2015 | 28 | 0 | 0 | -- | 28 |
| 3 | 2015-2016 | 26 | 0 | 0 | -- | 26 |
| 4 | 2016-2017 | 28 | 0 | 0 | -- | 28 |
| 5 | 2017-2018 | 30 | 0 | 0 | -- | 30 |
| 6 | 2018-2019 | 28 | 0 | 0 | -- | 28 |
| 7 | 2019-2020 | 25 | 0 | 0 | -- | 25 |

## <u>भाग दोन</u>

### महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशेब तपासणी नियम 1961 मधील नियम 18(1) प्रमाणे चालु लेखापरीक्षण - परिच्छेदांचा गोषवारा

### महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम मधील कलम 9 व महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशेब तपासणी नियम 1961 मधील नियम 17 नुसार

परिच्छेदांच्या गोषवाऱ्याचे विवरणपत्र :-

| अ.क्र | प्रकार | परिच्छेद क्रमांक |
|---|---|---|
| अ | कायद्याविरुध्द करण्यात आलेले प्रदान | 01 ते 08 |
| ब | कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुंळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झालेली तुटींची किवा नुकसानाची रक्कम | 09 ते 10 |
| क | लेख्यामध्ये दर्शविणे आवश्यक असलेली परंतु न दर्शवलेली रक्कम | निरंक |
| ड | वरील (अ) (ब) (क) व्यतिरीक्त लेख्यांत आढळुन आलेल्या महत्वाच्या अनुचित किवा नियमबाहय बाबी. | 11 ते 30 |
| इ | लेखापरीक्षकास आवश्यक वाटत असलेला महत्वाचा परिच्छेद | 2,3,4,10,22 |

Scanned with CamScanner

## महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम,1961 मधील नियम क्र.18 प्रमाणे

### परिच्छेद क्रमांक : 01) पंचायतीचा वार्षिक लेखा व मत्ता दायित्व विवरणावरुन आर्थिक स्थितीचा गोषवारा:

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता 2011 नियम 26(1) नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने, नमुना 3 मधील तसेच शासन वेळोवेळी विहीत करेल त्या नमुन्यात, ग्रामपंचायतीच्या जमा-खर्चाचा वार्षिक लेखा आणि संबंधित वितीय वर्षाअखेरच्या दिवसाचे मत्ता व दायित्वाचे विवरण नमुना 4 मध्ये तयार करुन, दरवर्षी 1 जून रोजी किंवा त्यापुर्वी पंचायत समितीस सादर करील. तसेच नियम 26(2) (एक) ते (सात) नुसार नमूद दस्तऐवज वार्षिक लेख्यासोबत जोडण्यात येतील. सदरचे वार्षिक लेखे आणि मत्ता व दायित्वाचे विवरण ग्रामसभेला सादर करण्यात येऊन त्यावर चर्चा करण्यात येईल आणि सरपंच व सचिव ग्रामसभेच्या आदेशाची नोंद घेतील व त्यांचे पालन करतील, अशी तरतूद आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीने कार्यवाही केलेले वार्षिक लेखे आणि मत्ता व दायित्व विवरण लेखापरीक्षणास दर्शविलेले आहे . लेखापरीक्षणासाठी सादर केलेले जमा - खर्च विवरण व इतर अनुषंगिक अभिलेख्यांवरुन दिनांक 31/03/2021 रोजीचा ग्रामनिधी, पाणीपुरवठा व इतर निधीच्या आर्थिक स्थितीचा गोषवारा खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता,2011 चा नियम 26 (1) (नमुना-4)

(अ) ग्रामपंचायतीचे मत्ता व दायित्वे दिनांक 31/03/2021 अखेरचे

| दायित्व | रक्कम (रुपये) | मत्ता | रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| 14 वित आयोग अखर्चित अनुदान | 525239.00 | ग्रामनिधी अखेर शिल्लक | 1739765.00 |
| 15 वि आयोग अखर्चित अनुदान | 757493.00 | पाणी पुरवठा अखेर शिल्लक | 70031.00 |
| 15%मागासवर्गीयखर्च करणे बाकी | 366446.00 | 14विआयोग अखर्चित अनुदान | 525239.00 |
| | 0 | 15विआयोग अखर्चित अनुदान | 757493.00 |
| मत्ता अधिक्य | 5533150.00 | करांची थकबाकी | 4089800.00 |
| एकुण एकदंर | 7182328.00 | एकुण एकदंर | 7182328.00 |

**ब) ग्रामपंचायतीच्या मागील दोन वर्ष व चालु वर्षातील जमा व खर्चाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.**

1.ग्रामनिधी

| वितीय वर्ष | उत्पन्न | खर्च |
|---|---|---|
| 2018-19 | -- | -- |
| 2019-20 | -- | -- |
| 2020-21 | 3081641 | 1569225 |
| एकुण- | 3081641 | 1569225 |
| सरासरी- | 3081641 | 1569225 |

**(2) इतर शासकिय अनुदान / निधी / जमा व खर्च तपशील –**

| अ.क्र. | निधी /योजना | 2020-2021 | |
|---|---|---|---|
| | | जमा | खर्च |
| 1 | 14 वा वित आयोग | 1863202 | 1337963 |
| 2 | 15 वा वित आयोग | 757493 | 0 |

वरील तक्ता (अ) व (ब) चे अवलोकन केले असता ग्रामपंचायतीचे उत्पन्न खर्चापेक्षा रुपये 1512416/- ने जादा आढळले. तसेच मत्ता दायित्वापेक्षा रुपये 5533150/- ने जादा आढळली. तथापि, घरपटटी व पाणीपटटीची येणे बाकी असलेली थकबाकीची रक्कम, तसेच इतर तत्सम येणे बाकी असलेल्या रकम/रकमा जोपावेतो संपूर्ण वसूल होत नाही, तोपर्यंत त्या रकमेला ख-या अर्थाने मत्ता म्हणता येणार नाही. त्यामुळे सदर येणे असलेले तथापि वसूल न



[Type text]

Scanned with CamScanner

केलेले उत्पन्न लवकरात लवकर वसूल करुन ख-या अर्थाने मत्ता वाढविणे गरजेचे आहे. यावरुन ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती समाधानकारक आहे.

ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक चौविआ-2015/प्र.क्र.107/वित-4, दिनांक 1 फेब्रुवारी, 2016 नुसार ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता / स्वउत्पन्नात वाढ करणे साठी खालील उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

1) मुबंई ग्राम पंचायत अधिनियम 1958 मध्ये ग्राम पंचायतीची कर व करेतर उत्पन्नाची साधने विहित केली आहेत. सदर बाबी व जिल्ह्यातील वस्तुस्थिती लक्षात घेऊन उत्पन्नात वाढ करण्याबाबत सखोल विचार केला गेला पाहिजे.

2) मुबंई ग्राम पंचायत अधिनियम 1958 कलम 124 व महाराष्ट्र ग्राम पंचायत कर व फी नियम 1960 मधील नियम 17 नुसार कर आकारणी यादीची दर 4 वर्षातून फेरआकारणी पूर्णपणे केली पाहिजे. तसेच नियमात नमूद केलेल्या कमाल दराच्या अधिन राहून सातत्याने कर आकारणी दरात वाढ करुन व त्याप्रमाणे वसूली करुन ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढविले पाहिजे.

3) पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण करण्यासाठी विशेष पाणीपटटीचे दराबाबत आढावा घेऊन आवश्यकतेनुसार दरामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

4) जमीन महसूल, मुद्रांक शुल्क, गौण खनिज इत्यादी सारख्या शासनाकडून मिळणा-या स्वउत्पन्नाच्या बाबतीत नियमित पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

5) ग्रामपंचायतीच्या कायमस्वरुपी उत्पन्नासाठी व्यावसायिक गाळे व तत्सम साधने निर्माण करणे, सदर गाळे बाजारभावानुसार भाडयाने देणे, गाळे भाडयात दरवर्षी ठराविक वाढ करणे, वेळोवेळी करांची नियमोचित फेरआकारणी करणे व या कराची वसूली 100 टक्के करुन थकबाकी राहणार नाही, याची दक्षता घेऊन व खर्चात काटकसरीच्या धोरणाचा अवलंब करुन ग्रामपंचायतीच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल, अशा सर्व उपाययोजना करणे आवश्यक आहे.

6) जमा व खर्चाचा परस्पर संबंध तपासून खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

7) खर्चात बचत करणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्रमांक: 02) ग्रामपंचायतीचे वार्षिक लेखे प्रमाणीकरणाबाबत:**

ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमएएस-2013 / प्र.क्र.14 / वित-6, दिनांक 5/10/2013 नुसार सर्व ग्रामपंचायतींनी त्यांचे लेखे मॉडेल अकाऊंन्टींग सिस्टीम (MAS) मधील 1 ते 8 नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीने सदर आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे ठेवले **नाहीत**.

प्रमाणीकरण:- ग्रामपंचायतीचे सदर आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे प्रमाणीत करतां येत नाहीत.

**परिच्छेद क्रं : 03) अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा जादा/शिवाय केलेल्या खर्चाबाबत :**

लेखापरीक्षण कालावधीत सन 2020-21 या वर्षाचे मंजुर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने उपरोक्त कालावधीत तरतूदीपेक्षा जादा खर्च झाला किंवा कसे? हे समजू शकले नाही.मुंबई ग्रामपंचायत अंदाजपत्रक व हिशोब नियम 1959 चे नियम 4(2) (पुनर्विनियोजन विवरणपत्रकाआधारे ) नुसार अधिक खर्च मंजुर करुन घेतला नसल्याने सदर कालावधीचे मंजूर अर्थसंकल्पीय अंदापत्रकाचे विवरणपत्र उपलब्ध करुन लेखापरिक्षणास दाखवावे व अंदाजपत्रकातील तरतूदीप्रमाणे खर्च केला असल्याची खात्री पटविणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्रमांक: 04) ग्रामनिधीच्या शिल्लकेचा बँक खात्यातील शिल्लकेशी ताळमेळ न घेणे :**

ग्रामनिधी रोख नोंदवहीच्या दिनांक 31/3/2021 शिलकेची व बँक पासबुक मधील दि. 31/03/2021 शिलकेची तपासणी केली असता र.रु.345614/- एवढया रकमेची तफावत असल्याचे निदर्शनास आले.

ग्रामपंचायतीने वितीय सालात धनादेशाने केलेल्या जमा खर्च व्यवहाराचा नोंदवही अधारे व बँक पास बुक / स्क्रोल सह ताळमेळ घेवुन वितीय सालात अखेरीस बँकेची शिल्लक व पासबुक मधील 31/3/2021 ची शिल्लकेची पडताळणी

Scanned with CamScanner

केलेबाबत व त्यातील त्रुटीबाबत किर्दीस मेळ दर्शवुन सत्यता निदर्शनास आणणे आवश्यक असता सचिव या नात्याने संबंधीत व्यक्तीने तसे केलेले नाही. सदर बाब नियम बाहय आहे. ग्रामपंचायतीकडील खालीलप्रमाणे बँकपासबुक व किर्द शिल्लकेबाबत तफावत असल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | वितीय वर्ष | बँक खाते क्रमांक | रोखवहीमधील शिल्लक दि.31/3/2021 | बँक खात्यातील शिल्लक दि.31/3/2021 | तफावत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2020-2021 | 1491 | 1739765 | 1394151 | 345614 |
| एकुण | | | 1739765 | 1394151 | 345614 |

**परिच्छेद क्रमांक: 05) नियमबाहय अधिक रोख रक्कम हाती बाळगणे**

मुंबई ग्रामपंचायत (ग्रामनिधीची अभिरक्षा व गुंतवणूक) नियम 1959 चे नियम 2 अन्वये ग्रामपंचायतीस मिळालेल्या सर्व निधी व त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधान्वये तिला उपर्जित होणाऱ्या सर्व रक्कमा, ग्रामपंचायतीला मिळालेल्या दिनांकापासून 7 दिवसांच्या आत ग्रामनिधीत जमा करण्यात येतील असे नमुद करण्यात आले आहे.

मुंबई ग्रामपंचायत (मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 57 (3) (ड) नुसार ग्रामपंचायतीच्या आकस्मिक खर्चासाठी एकावेळी रु. 150/- पेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम व मुंबई ग्रामपंचायत (ग्रामनिधीची अभिरक्षा व गुंतवणूक) नियम 1959 मधील 3 (1) नुसार ग्रामपंचायतीस तिच्या चिटणीसास चालू खर्च भागविण्यास वाजवी किंमतीत विकण्यात येणाऱ्या मालाची दुकाने चालविणाऱ्या पंचायतीच्या बाबतीत रु. 500/- पेक्षा अधिक नसेल इतकी व इतर ग्रामपंचायतीच्या बाबतीत रु. 150/- पेक्षा अधिक नसेल इतकी कायमस्वरुपाची आगाऊ रक्कम ठेवण्याची तरतूद असताना त्यापेक्षा जास्त रक्कम नियमबाहयरित्या हाती बाळगली आहे. सदर नियमबाहयतेबाबत साधार अनुपालन सादर करण्यात यावे.

**परिच्छेद क्रमांक: 06) साहित्य खरेदीतील अनियमितता :**

1) महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांक : भांखस-2014 /प्र.क्र.82/ भाग-III/उद्योग-4, दिनांक : 1 डिसेंबर 2016 नुसार दिनांक : 01/12/2016 नंतर करण्यात येणारी कोणतीही खरेदी प्रक्रिया ही सदर शासन निर्णयातील उपपरिच्छेद 9 नियम पुस्तकेच्या परिच्छेद 3.2.3 मध्ये नमूद केल्यालेल्या कार्यपद्धतीनुसार रु. 3 लाखापर्यंतच्या खरेदीसाठी विहीत मार्गाने दरपत्रके मागवून खरेदी करणे आवश्यक होते. तथापि, त्या वस्तूचे एका आर्थिक वर्षात दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रुपये 3,00,000/- पेक्षा जास्त नसावे, याचे खरेदीदार विभागाने काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

2) उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं 2016/प्र.क्र.215/उदयोग-4, दि.24.8.2017 नुसार केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई मार्केट प्लेस (Gem) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्वीकृत केलेली आहे. ग्रामपंचायतीने त्यानुसार Gem पोर्टलवरुन खरेदी प्रक्रिया करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) केंद्रीय वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 चे कलम -51, महाराष्ट्र वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 व महाराष्ट्र शासन वित विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2018/प्र.क्र.144/2018/कोषा-प्रशा-5 दिनांक 28 सप्टेंबर 2018 अनुसार दिनांक 1 ऑक्टोबर 2018 पासून वस्तु किंवा सेवा अथवा दोन्ही यांच्या पुरवठयासाठी करावयाच्या प्रदानावेळी जर सदरहू पुरवठयाची संविदा करपात्र वस्तु किंवा सेवा अथवा दोन्हींच्या संदर्भात असेल व त्या संविदेचे मुल्य रुपये 250000/- रकमेच्या वर असल्यास अशी वजावट करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच सदर शासन निर्णयातील अ.क्र. 3 अनुसार दिनांक 1 ऑक्टोबर 2018 पुर्वी करण्यात आलेल्या संविदाच्या बाबतीत देखील टीडीएस च्या तरतुदी लागु करणेत आलेल्या आहेत. ग्रामपंचायतीने उपरोक्त साहित्य खरेदीमधील बाबींसाठी खरेदीमध्ये 2 टक्के जीएसटी/टीडीएस कपात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.



Scanned with CamScanner

| निधी | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| ग्रामनिधी | 09 | 7.4.20 | 8000 | सार्व.आरोग्य साहीत,दुर्गा एंटरप्रायजेस |
| --//-- | 12 | 2.5.20 | 6308 | पा.पु.साहित्य खरेदी,पांगारे ॲग्रो एजन्सी |
| --//-- | 26 | 28.5.20 | 13216 | कोरोना किट खरेदी,मल्टीस्टार टेक. |
| --//-- | 27 | --//-- | 12000 | गटार दुरुस्ती,सत्यहरी एंटरप्रायजेस |
| --//-- | 33 | 1.6.20 | 9000 | संगणक साहीत,स्वाती सुनिल शिंदे |
| --//-- | 43 | 11.6.20 | 14533 | पा.पु.साहित्य खरेदी,दत्त एंटरप्रायजेस |
| --//-- | 65 | 7.8.20 | 39998 | पा.पु.साहित्य खरेदी,सम्राट सेल्स |
| --//-- | 89 | 17.8.20 | 14500 | पा.पु.साहित्य खरेदी,सिध्दीविनायक |
| --//-- | 90 | --//-- | 12000 | पा.पु.साहित्य खरेदी,सिध्दीविनायक |
| --//-- | 91 | --//-- | 21600 | एलईडी दिवे खरेदी,दुर्गा एंटरप्रायजेस |
| --//-- | 104 | 17.10.20 | 8185 | पा.पु.दुरुस्ती,सत्यहरी एंटरप्रायजेस |
| --//-- | 134 | 5.2.21 | 12360 | ऑफीस साहीत,साई ट्रेडर्स |
| --//-- | 140 | --//-- | 9100 | इलेक्ट्रिक दुरुस्ती,गुरुदत्त इंजिनिअरिंग |
| --//-- | 144 | --//-- | 30500 | कोरोना साहित्य खरेदी,दुर्गा एंटरप्रायजेस |
| --//-- | 149 | 3.3.21 | 10600 | जेसीबी भाडे,सखाराम बडवे |
| --//-- | 155 | --//-- | 6382 | दिवाबत्ती साहीत,आयजी हार्डवेअर |
| --//-- | 163 | 18.3.21 | 1050 | जेसीबी भाडे,पार्थ ट्रान्सपोर्ट |
| --//-- | 165 | --//-- | 30000 | 15%मा.व.खर्च,पत्रे खरेदी,सावित्री साठे |
| पाणीपुरवठा | 05 | 18.3.21 | 5065 | दिवाबत्ती साहीत,श्रीकृष्ण महावीर |
| --//-- | 07 | --//-- | 3700 | इले.दुरुस्ती,संगम इले. |
| एकूण | | | 268097 | |

**परिच्छेद क्रमांक: 07) पाणी पुरवठा जमा व खर्चाबाबत :**

ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठाबाबत खालीलप्रमाणे पाणीपट्टीची जमा व पाणीपुरवठावर खर्च झाला आहे.

| वितीय वर्ष | जमा रक्कम रुपये | खर्च रक्कम रुपये | जादा खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 2020-2021 | 113670 | 128712 | 15042 |
| एकुण | 113670 | 128712 | 15042 |

उपरोक्त जमा खर्चाच्या तपशिलावरुन असे दिसून येते की संबंधित ग्रामपंचायतीच्या जमा पाणीपट्टी पेक्षा पाणीपुरवठयाचा खर्च जादा असल्याने ग्रामपंचायतींना अन्य निधीमधून नियमबाहयरित्या खर्च केल्याचे दिसून येते. सदर बाबतीत पाणीपट्टीची वसुलीच टक्केवारी वाढविणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्रमांक: 08) टी. सी. एल. खरेदीबाबत :**

विषयांकित बाबत, लेखापरीक्षण वर्षात पंचायतीने खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| वितीय वर्ष | निधीचा तपशिल | खर्च रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 2020-2021 | पाणीपुरवठा | 19947 | टीसीएल खरेदी |

1) खरेदी केलेल्या टी.सी.एल मध्ये 33% क्लोरीनचे प्रमाण असल्याबाबत प्राधिकृत अधिका-याचे प्रमाणपत्र प्रमाणकासोबत आढळून आलेले नाही.



Scanned with CamScanner

2) टी.सी.एल खरेदीची नोंद नमुना नं.15 (साठा नोंदवही) मध्ये घेणे आवश्यक असताना तसे केल्याचे आढळून आले नाही.

3) उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखरां-2014/प्र क्र 82/भाग III /उदयोग-4, दि.1.12.2016 नुसार रुपये 5000/- पेक्षा जास्त परंतु 3,00,000/- पर्यंतच्या साहित्याची खरेदी दरपत्रके मागवून आणि रुपये 3,00,000-/ पुढील साहित्य खरेदी करण्यासाठी ई निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे शासकीय कार्यालयांना बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार नियमाचित कार्यवाही नाही.

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 9 व महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशेब तपासणी नियम 1961 मधील नियम 17 नुसार "ब" वर्गीकरणाचे परिच्छेद**

**परिच्छेद क्रमांक : 09) ग्रामनिधीतून केलेल्या विकास कामांबाबत :**

पंचायतीने सन 2020-21 या कालावधीत ग्रामनिधीतून खाली नमूद बांधकामे केलेली आहेत.

| अ.क्रं. | सन | बांधकामाचे नांव | मक्तेदाराचे नांव | कामावरील खर्च | मुल्यांकन रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| विवरणपत्र क्रमांक 11 नुसार | | | | | |

अहवाल वर्षात ग्रामपंचायतीने ग्रामानिधी तसेच विविध योजनांमधून केलेल्या विकास कामांचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र क्रमांक 11 पंचायतीने लेखापरीक्षणास सादर केलेला असुन सदर विवरणपत्र या अहवालासोबत संलग्न करण्यात आलेले आहे. सदर विवरणपत्रानुसार पंचायतीने अहवाल वर्षात विकासकामांकरीता एकूण र.रु.3,77,111/- खर्च केलेला आहे.

सदर खर्चावरील लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 नियम 56(1) नुसार रु. 50000/- पेक्षा अधिक खर्चाच्या प्रत्येक बांधकामासाठी निविदा मागविणे बंधनकारक आहे. त्यानुसार अहवाल वर्षात कार्यवाही न करता विवरणपत्र क्रमांक 11 मध्ये नमुद कामे पंचायतीने स्वत: केलेली आहेत.

2) विवरणपत्रात नमुद केलेली कामे ही पंचायतीने स्वत:च्या मालकीच्या जागेत केली असले बाबत 7/12 उतारे तपासणीस मिळाले नाही. तसेच पुर्ण नवीन कामाच्या नोंदी स्थावर मालमता नोंदवही व रस्ता नोंदवही न.नं. 22 व 23 मधे घेण्यात आल्या असल्यबाबत सदर नोंदवहया उपलब्ध करुन पुर्तता दर्शवावी.

3) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 नियम 53(1) नुसार प्रकल्प नोंदवही ठेवणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) सदर बांधकामाकरिता विविध प्रकारचे बांधकाम साहित्य खरेदी करण्यात आले असून, सदर खरेदी करण्यात आलेले साहित्य हे योग्य दर्जाचे व गुणवतेचे असल्याबाबत प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल नसल्यामुळे वापरण्यात आलेले साहित्य योग्य दर्जाचे आहे असे म्हणता येत नाही.तरी याबाबत प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल उपलब्ध करून पुर्तता दर्शवावी.

5) जिल्हा दरसुची/राज्य दरसुची लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे अंदाजपत्रकीय दरांच्या व प्रदान केलेल्या दरांच्या अचुकतेची तपासणी लेखापरीक्षणात करता आली नाही. दरसुचीनुसार सदर कामांचे बाबनिहाय मुळ दर व त्यानुसार केलेले दरविश्लेषण अचुक असलेबाबत साधार खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 168(1)(क) नुसार तांत्रिक अधिकारी यांनी कामाची तपासणी करणे आवश्यक असताना कामांची तपासणी केल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले नाही.

7) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक- भाखसं-201/प्र.क्र 82/भाग-3/उद्योग-4, दि.01 डिसेंबर 2016 नुसार रुपये 5000 (एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त रक्कम रुपये 50000 पर्यत) पेक्षा जास्त परंतु



Scanned with CamScanner

300000 पर्यंतच्या साहित्याची खरेदी दरपत्रके मागवून आणि रूपये 300000 पुढील साहित्य खरेदी तुलनात्मक निविदा व ई निविदा मागवून करणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही

8) केंद्रीय वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 चे कलम 51, महाराष्ट्र वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 व महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2018/प्र.क्र. 144/2018/कोषा-प्रशा-5 दिनांक 28 सप्टेंबर 2018 अनुसार दिनांक 1 ऑक्टोबर 2018 पासून वस्तु किंवा सेवा अथवा दोन्ही यांच्या पुरवठ्यासाठी करावयाच्या प्रदानातेवेळी जर सदरहू पुरवठ्याची संविदा करपात्र वस्तु किंवा सेवा अथवा दोन्हींच्या संदर्भात असेल व त्या संविदेचे मूल्य रूपये 250000/- पेक्षा जास्त असल्यास अशी वजावट करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच सदर शासन निर्णयातील अ.क्र. 3 अनुसार दिनांक 1 ऑक्टोबर 2018 पूर्वी करण्यात आलेल्या संविदांच्या बाबतीत देखील जीएसटी च्या तरतुदी लागू करणेत आलेल्या आहेत. ग्रामपंचायतीने उपरोक्त साहित्य खरेदीसंबंधीत बाबींसाठी खरेदीमध्ये 2 टक्के जीएसटी/टीडीएस कपात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही

9) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 नियम 61(ग) नुसार बांधकामांच्या खर्चाचे देयक नमुना 23(ख) मध्ये तयार करून प्रदान करणे आवश्यक असताना त्यानुसार विहित नमुन्यात देयक तयार करण्यात आलेले नाही.

10) आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार दि. 01/07/2010 पासून ठेकेदार व उपठेकेदारास एकावेळी प्रदान रु. 30,000/- व वार्षिक प्रदान रु. 75,000/- असेल तेव्हा अनुक्रमे 2 % (संस्थात्मक) व 1 % (वैयक्तिक नावे) या दराने आयकर कपात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

11) कामगार विमा- शासन निर्णय वित्त विभाग क्रं. विकास/1098/प्रक्र 2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्रं. प्राविनिय/2300/ सहविमा /सांबावि/ संकीर्ण/फ दिनांक 20/4/2001 व समक्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 0.50 टक्के विमा वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

12) उपकर- शासन निर्णय क्रं. उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्रं. बीसीए/2009/प्रक्र/108/कामगार/7अ दिनांक 17 जुन 2010 नुसार 1% उपकर वसुल करून कामगार कल्याण मंडळाकडे जमा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

13) रॉयल्टी- महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रं. गौखनि/10/1009/ प्रक्र209 ख दिनांक 11/2/2010 ऐवजी महसुल व वनविभाग अधिसूचना दिनांक 11/5/2015 अन्वये प्रति घमी रुपये 141.34 प्रमाणे गौण खनिजाची रक्कम संबंधित मक्तेदार यांचेकडुन रक्कम वसुल करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त बाबींच्या पुर्तते अभावी खर्च र.रु.3,77,111/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**<u>परिच्छेद क्रमांक: 10) चौदावा वित आयोगातून केलेल्या बांधकामांबाबत :</u>**

चौदावा वित आयोग योजनेतुन खालील प्रमाणे विकास कामे करण्यात आलेली आहेत.

| अ.क्रं. | सन | बांधकामाचे नांव | मक्तेदाराचे नांव | कामावरील खर्च रक्कम रुपये | मुल्यांकन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2020-2021 | फिल्टर प्लॅट करणे | जे.सी.एंटर. | 298185 | 299040 |
| 2 | 2020-2021 | दलितवस्तीत गटार दुरुस्ती | --//-- | 65800 | 69549 |
| एकुण | | | | 363985 | 368589 |

सदर खर्चाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीपीडीपी-2015/प्र.क्र.38/पं.रा.-6 दिनांक 4-11-2015 नुसार आमचा गाव आमचा विकास अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा चौदावा वित आयोग कालावधीकरीता म्हणजेच आर्थिक वर्ष सन 2015-16 ते 2020-2120 करीता पंचवार्षिक बृहत विकास आराखडा व



Scanned with CamScanner

दरवर्षी वार्षिक कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. सदर पंचवार्षिक मंजुर आराखडा व वार्षिक कृती आराखडा मुळप्रती तपासणीस उपलब्ध न झाल्यामुळे 14 वा वित्त आयोग योजनेतुन उपरोक्त प्रमाणे केलेल्या बाबींचा पंचवार्षिक बृहत विकास आराखडा व वार्षिक कृती आराखडयात समावेश असलेबाबत खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही. तसेच सदर साहित्य खरेदीस मजुरी दिलेबाबतचे तांत्रिक पडताळणी समितीची मजुरीचे आदेश तपासणीस उपलब्ध झाले नाही. तरी पंचवार्षिक आराखडा, तालुकास्तरीय तांत्रिक समितीचे आदेश तसेच ग्रामसभा इतिवृत उपलब्ध करून सदर योजनांना/बाबींना मान्यता असलेबाबत साधार खात्री पटवावी

2) केंद्रीय वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 चे कलम -51, महाराष्ट्र वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 व महाराष्ट्र शासन वित विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2018/प्र.क्र.144/2018/कोषा-प्रशा-5 दिनांक 28 सप्टेंबर 2018 अनुसार दिनांक 1 ऑक्टोबर 2018 पासून वस्तु किंवा सेवा अथवा दोन्ही याच्या पुरवठयासाठी करावयाच्या प्रदानावेळी जर सदरहू पुरवठयाची संविदा करपात्र वस्तु किंवा सेवा अथ्वा दोन्हींच्या संदर्भात असेल व त्या संविदेचे मुल्य रुपये 250000/- रकमेच्या वर असल्यास अशी वजावट करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच सदर शासन निर्णयातील अ.क. 3 अनुसार दिनांक 1 ऑक्टोबर 2018 पुर्वी करण्यात आलेल्या संविदाच्या बाबतीत देखील टिडीएस च्या तरतुदी लागु करणेत आलेल्या आहेत. ग्रामपंचायतीने उपरोक्त साहित्य खरेदीमधील बाबींसाठी खरेदीमध्ये 2 टक्के जीएसटी/टीडीएस कपात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 नियम 56(1) नुसार रु. 50000/- पेक्षा अधिक खर्चासाठी निविदा मागविणे बंधनकारक आहे परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक- भाखसं-201/प्र.क्र 82/भाग-3/उद्योग-4, दि.01 डिसेंबर 2016 नुसार रूपये 5000 (एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त रक्कम रुपये 50000 पर्यंत) पेक्षा जास्त परंतु 300000 पर्यंतच्या साहित्याची खरेदी दरपत्रके मागवून आणि रूपये 300000 पुढील साहित्य खरेदी वृत्पत्रात जाहिर निविदा व ई- निविदा मागवून करणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 नियम 61(ग) नुसार बांधकामांच्या खर्चाचे देयक नमुना 23(ख) मध्ये तयार करून प्रदान करणे आवश्यक असताना त्यानुसार विहित नमुन्यात देयक तयार करण्यात आलेले नाही.

6) विवरणपत्रात नमुद केलेली कामे ही पंचायतीने स्वत:च्या मालकीच्या जागेत केली असले बाबत 7/12 उतारे तपासणीस मिळाले नाही. तसेच पुर्ण नवीन कामाच्या नोंदी स्थावर मालमता नोंदवही व रस्ता नोंदवही न.नं. 22 व 23 मधे घेण्यात आल्या असल्यबाबत सदर नोंदवहया उपलब्ध करून पुर्तता दर्शवावी.

7) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता 2011 नियम 53(1) नुसार प्रकल्प नोंदवही ठेवणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8) सदर बांधकामाकरिता विविध प्रकारचे बांधकाम साहित्य खरेदी करण्यात आले असून, सदर खरेदी करण्यात आलेले साहित्य हे योग्य दर्जाचे व गुणवतेचे असल्याबाबत प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल नसल्यामुळे वापरण्यात आलेले साहित्य योग्य दर्जाचे आहे असे म्हणता येत नाही.तरी याबाबत प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल उपलब्ध करून पुर्तता दर्शवावी.

9) जिल्हा दरसुची/राज्य दरसुची लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे अंदाजपत्रकीय दरांच्या व प्रदान केलेल्या दरांच्या अचुकतेची तपासणी लेखापरीक्षणात करता आली नाही. दरसुचीनुसार सदर कामांचे बाबनिहाय मुळ दर व त्यानुसार केलेले दरविश्लेषण अचुक असलेबाबत साधार खात्री पटवावी.

10) आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार दि. 01/07/2010 पासून ठेकेदार व उपठेकेदारास एकावेळी प्रदान रु. 30,000/- व वार्षिक प्रदान रु. 75,000/- असेल तेव्हा अनुक्रमे 2 % (संस्थात्मक) व 1 % (वैयक्तिक नावे ) या दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे.

11) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय बीडीजी/2005/प्र.क्र.324/इमा.2, दि. 03/03/2006 मधील मुद्दा क्र. 4 नुसार मुल्यवर्धित कर अधिनियमानुसार नोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातून अधिसूचना क्र. व्हीएटी -1505/सीआर

Scanned with CamScanner

13/करापत्र-1 दि 01/04/2005 व अधिसूचना क्र जेजी [illegible] 2005 [illegible] दि.04/04/2012 नुसार [illegible]

01/04/12 पासून मूल्यवर्धित कर 5 % वसूल करणे बंधनकारक आहे

12) कामगार विमा- शासन निर्णय वित्त विभाग क्र [illegible] 098/प्रक 2889/शासन [illegible] दिनांक 19/8/1998 [illegible]

संचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा क्र [illegible]/2300 [illegible] दिनांक 20/4/200[illegible]

समक्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 6मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कपाती कामाच्या 1.30 [illegible]

उपकर वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे

13) उपकर- शासन निर्णय क्र उद्योग.उर्जा व कामगार विभाग क्र. [illegible]/2009/प्रक 108/कामगार [illegible] दिनांक [illegible]

जुन 2010 नुसार 0.90 % उपकर वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे

14) रॉयल्टी- महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र गौखनि/10/1009 [illegible]

दिनांक 11/2/2010 ऐवजी महसुल व वनविभाग अधिसूचना दिनांक 11/5/2015 अन्वये प्रति घनी [illegible]

प्रमाणे गौण खनिजाची रक्कम संबंधित मक्तेदार यांचेकडुन रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबींच्या पुर्ततेअभावी खर्च र.रु. 3,63,985/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे

**<u>महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 9 व महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखे तपासणी नियम 1961 मधील नियम 17 नुसार "क" वर्गीकरणाचे परिच्छेद</u>**

**—— नि रं क ——**

**<u>महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 9 व महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखे तपासणी नियम 1961 मधील नियम 17 नुसार "ड" वर्गीकरणाचे परिच्छेद</u>**

**<u>परिच्छेद क्रमांक: 11) चौदावा वित आयोग योजनेतुन केलेल्या साहित्य खरेदीबाबत :</u>**

चौदावा वित आयोग योजनेतुन खालील प्रमाणे साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | खरेदी साहित्य तपशिल | पुरवठादार |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 20.6.20 | 92430 | रुग्णवाहिका खरेदी | गटविकास अधिकारी |
| 2 | 5 | 18.8.20 | 37450 | टीसीएल व मेडीक्लोर | श्री.नागेश [illegible] |
| 3 | 6 | --//-- | 25200 | मेडीक्लोर खरेदी | मेहा [illegible] |
| 4 | 7 | 9.11.20 | 144000 | हायमास्ट पोल खरेदी | [illegible] इले. |
| 5 | 9 | --//-- | 80346 | कोरोना साहित्य खरेदी | आयुष [illegible] |
| 6 | 10 | --//-- | 89400 | हायमास्ट दिवे एलईडी | ग्लोबल सोलर एनर्जी |
| 7 | 12 | 18.3.21 | 79000 | अंगणवाडीसाठी टेबल व खुर्च्या | उमेश [illegible] |
| 8 | 13 | --//-- | 48000 | अंगणवाडी रंगकाम | दुर्गेश पेंटींग वर्क्स |
| 9 | 14 | --//-- | 12000 | रस्ता चेंबर दुरुस्ती | [illegible] हटे |
| 10 | 15 | --//-- | 95400 | अंगणवाडीसाठी साहित्य खरेदी | आयुष [illegible] |
| एकुण | | | 703226 | | |

सदर खर्चाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक जीपीडीपी-2015/प्र.क्र.38/पं.रा.-6 दिनांक 4-11-2015 नुसार आमचा गाव आमचा विकास अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा चौदावा वित्त आयोग [illegible] म्हणजेच आर्थिक वर्ष सन 2015-16 ते 2020-2120 करीता पंचवार्षिक बृहत विकास आराखडा व दरवर्षी वार्षिक कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. सदर पंचवार्षिक मंजुर आराखडा व वार्षिक कृती आराखडा [illegible] तपासणीस उपलब्ध न झाल्यामुळे 14 वा वित आयोग योजनेतुन उपरोक्त प्रमाणे केलेल्या बाबींचा पंचवार्षिक बृहत विकास आराखडा व वार्षिक कृती आराखडयात समावेश असलेबाबत खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही. [illegible]

Scanned with CamScanner

सदर साहित्य खरेदीस मंजुरी दिलेबाबतचे तांत्रिक पडताळणी समितीची मंजुरीचे आदेश तपासणीस उपलब्ध झाले नाही. तरी पंचवार्षिक आराखडा, तालुकास्तरीय तांत्रिक समितीचे आदेश तसेच ग्रामसभा इतिवृत उपलब्ध करुन सदर योजनांना/बाबींना मान्यता असलेबाबत साधार खात्री पटवावी.

2) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक- भाखसं-201/प्र.क्र 82/भाग-3/उद्योग-4, दि.01 डिसेंबर 2016 नुसार रूपये 5000 (एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त रक्कम रुपये 50000 पर्यंत) पेक्षा जास्त परंतु 300000 पर्यंतच्या साहित्याची खरेदी दरपत्रके मागवून आणि रूपये 300000 पुढील साहित्य खरेदी वृतपत्रात जाहिर निविदा व ई- निविदा मागवून करणे बंधनकारक असताना तसेच ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक- संकीर्ण 2013 / प्र.क्र.49 / पं रा-7, दिनांक 07/02/2013 नुसार शासनाने पंचायत राज संस्थाअंतर्गत रूपये 100000 व त्यापेक्षा अधिक किंमतीची साहित्य खरेदी/सेवापुरवठा यासाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे एकत्रितपणे आवश्यक साहित्याची खरेदी करणे आवश्यक असताना वेळोवेळी कामनिहाय दरपत्रके मागवुन खरेदी करण्यात आलेली आहे.

3) उदयोग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-2016/प्र.क्र.215/उदयोग-4 दि.24ऑगस्ट 2017 अन्वये शासकिय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणमध्ये सुधारणा करून केंद्र शासनाने विकसीत केलेल्या गव्हर्मेंट इ-मार्केटप्लस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनाने स्वीकृत केली असून नमूद शासन तरतूदीप्रमाणे ग्रामपंचायतीने कार्यवाही करुन वस्तूंची खरेदी केलेली नाही. त्यामुळे विवरणपत्र क्र.11 मध्ये दर्शविलेल्या कामांकरीता केलेल्या साहित्य खरेदी करीता पंचायतीला स्पर्धात्मक दरांचा अचुक लाभ झाला नाही.

4) केंद्रीय वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 चे कलम -51, महाराष्ट्र वस्तु व सेवा कर अधिनियम 2017 व महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2018/प्र.क्र.144/2018/कोषा-प्रशा-5 दिनांक 28 सप्टेंबर 2018 अनुसार दिनांक 1 ऑक्टोबर 2018 पासून वस्तु किंवा सेवा अथवा दोन्ही यांच्या पुरवठयासाठी करावयाच्या प्रदानावेळी जर सदरहू पुरवठयाची संविदा करपात्र वस्तु किंवा सेवा अथ्वा दोन्हींच्या संदर्भात असेल व त्या संविदेचे मुल्य रुपये 250000/- रकमेच्या वर असल्यास अशी वजावट करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच सदर शासन निर्णयातील अ.क्र. 3 अनुसार दिनांक 1 ऑक्टोबर 2018 पुर्वी करण्यात आलेल्या संविदाच्या बाबतीत देखील टिडीएस च्या तरतुदी लागु करणेत आलेल्या आहेत. ग्रामपंचायतीने उपरोक्त साहित्य खरेदीमधील बाबींसाठी खरेदीमध्ये 2 टक्के जीएसटी/टीडीएस कपात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) **खरेदी केलेल्या साहित्याची नोंद नमुना नंबर 15 (मालसाठा नोंदवही) ला घेऊन वाटप करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.**

उपरोक्त बाबींच्या पुर्ततेअभावी खर्च र.रु. 7,03,226/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्रमांक : 12) चौदावा वित आयोग योजनेतुन आपले सरकार सेवा केंद्रास प्रदान केलेल्या रकमांबाबत :**

अहवाल वर्षात पंचायतीने चौदावा वित आयोग योजनेतुन आपले सरकार सेवा केंद्रास प्रदान केलेल्या रकमांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | निधीचे नांव | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 2020-2021 | 14 वा | 160825 | जि.प.कडे वर्ग |
| एकूण | | | 160825 | |

सदर खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संग्राम -2015/ प्र.क्र. 93/संग्राम कक्ष दिनांक 11-08-2016 तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक आसक-2017/प्र.क्र.32/आपले सरकार कक्ष दिनांक 06 सप्टेंबर 2017 नुसार आपले सरकार सेवा केंद्र उभारणी व अंमलबजावणी बाबत मार्गदर्शक सुचना


[Type text]

Scanned with CamScanner

देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही केलेबाबतचे अभिलेखे/ कागदपत्रे तसेच सदर केंद्राने पुरविलेल्या सेवा बाबतची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे अहवाल वर्षात 14 वा वित्त आयोग मधून केलेला खर्च अचुक व योग्य असलेबाबतची खात्री करता आलेली नाही. सदर शासन निर्णयानुसार केंद्रचालकाने पुरविलेल्या सेवा व उपस्थितीबाबत संबधित कागदपत्रे उपलब्ध करुन उपरोक्त नमुद केलेनुसार केलेले प्रदान अचुक व योग्य असलेबाबत साधार खात्री पटवावी. तसेच उपरोक्त नमुद दिनांक 06 ऑक्टोबर 2017 च्या परिपत्रकानुसार आपले सरकार सेवा प्रकल्पाअंतर्गत देयक संगणक प्रणालीद्वारे सीएससी-एसपीव्हीस अदा करणेबाबतच्या सुचना नमुद आहेत. त्यातील अ.क्र 3.3 नुसार संगणक प्रणालीत तयार झालेले देयक व अ.क्र 3.4 नुसार ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी देयकाची तपासणी करुन बाबनिहाय सेवा पुरविल्याची नोंद केल्यानंतर केंद्र चालकाचा मोबदला व सीएससी-एसपीव्हीचे देयक अंतिम होणार असल्याचे नमुद आहे. त्यानुसार तपासणी केल्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करून अचुक देयक प्रदान केलेबाबत साधार खात्री पटवावी.

4. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संग्राम-2015/प्र.क्र.93/संग्रामकक्ष दिनांक 11 ऑगस्ट 2016 मधिल अ.क्र.2 मध्ये नमुद केलेप्रमाणे सदर ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र आपले सरकार सेवा केंद्र उभारणी केले आहे किंवा सदर गामपंचायतीचा समावेश क्लस्टर्स (गट) मध्ये करण्यात आलेला आहे. याबाबत लेखापरीक्षणात संबंधित कागदपत्रे उपलब्ध करण्यात आलेली नाहीत. तसेच उपरोक्त नमुद केलेल्या रकमा कोणत्या कालावधीचे देयकापोटी प्रदान करण्यात आलेल्या आहेत याबाबतचा तपशिल नसल्याने सदर प्रदान अचुक व योग्य असलेबाबतची तपासणी लेखापरीक्षणात करता आली नाही. तरी संबंधित लेखे उपलब्ध करून प्रदानाची अचुकता पटवावी.

उपरोक्त बाबींच्या पुर्ततेअभावी केलेला खर्च र.रु 1,60,825/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**<u>परिच्छेद क्रमांक: 13) अखर्चित अनुदानाबाबत :</u>**

ग्रामपंचायतीला केंद्र / राज्यशासनाकडून प्राप्त झालेल्या विविध अनुदान / निधी हा संबंधित शासन निर्णयानुसार विविध केलेल्या मार्गदर्शक तत्वे व सुचनांनुसार विहीत कालावधीमध्ये व निकषानुसार खर्च करणे बंधनकारक असतांना ग्रामपंचायतीने खालील प्रमाणे निधी /अनुदान अखर्चित ठेवल्याचे दिसून येते तरी सदर अखर्चित अनुदानाबाबत संबंधित शासन निर्णय व परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार नोंदवहीआधारे मेळ ठेवणे आवश्यक असता त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सबब अनुदान ज्या बाबींवर जमा आहे ते त्याच बाबीवर खर्च करणे बंधनकारक आहे.

| अ.क्र. | निधीचा तपशिल | प्राप्त अनुदान/निधी | खर्च केलेला निधी | शिल्लक / अखर्चित राहिलेला निधी |
|---|---|---|---|---|
| 1 | 14 वा वित्त आयोग | 1863202 | 1337963 | 525239 |
| 2 | 15 वा वित्त आयोग | 757493 | 0 | 757493 |

**<u>परिच्छेद क्रमांक : 14) आस्थापनेवरील खर्च :</u>**

1)शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक व्हीपीएम/2689/2297-21, दिनांक 29/12/1989 नुसार ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या 25% पेक्षा जास्त खर्च आस्थापनेवर करू नये.शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक व्हीपीएम-1013/प्र.क्र.60/पंरा-3, दिनांक 29/12/1989 व दि.8/7/2013 अन्वये ग्रामपंचायतीचे एकूण उत्पन्नाचे 35% पर्यत वाढविण्यांस मान्यता देण्यांत आली आहे.मर्यादापेक्षा जादा खर्च न केलेबाबतची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.व्हीपीएम-2699/प्र.क्र.206(1)/21,दि. 21/01/2000 अन्वये शासनाने ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकसंख्येच्या वर्गवारीनुसार कर्मचाऱ्यांसाठी आकृतीबंध निश्चित करुन किमान वेतनासाठी येणाऱ्या खर्चाच्या 50% रक्कम अनुदान म्हणून देण्याचा निर्णय व उर्वरित 50% खर्च स्वउत्पन्नातून संबंधित ग्रामपंचायतीने करणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.व्हीपीएम 1001/प्र.क्र.1144/21,दि. 24/12/2001 अन्वये
कर्मचाऱ्यांना त्यांचे किमान वेतन धनादेशाद्वारे प्रदान करणे आवश्यक आहे.

4) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम-2600/प्र.क्र.685/21,दि. 21/11/2000 अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत (कर्मचारी) भविष्य निर्वाह निधी नियम 1961 लागू करण्यात आला असून नियम 6 अन्वये भविष्य निर्वाह निधी नियमितपणे कपात करणे आवश्यक आहे. तसेच नियम 7 नुसार कर्मचाऱ्याच्या वर्गणीइतकीच रक्कम ग्रामपंचायतीने अंशदान देणे आवश्यक आहे.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.व्हीपीएम 2600/प्र.क्र.685/21 ,दि. 22/11/2000 अन्वये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके व त्यातील नोंदी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

6) विक्रीकर विभाग अधिनियम 1975 नुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनातून विहीत दराने व्यवसायकर कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.तथापि याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.व्यवसाय कर अधिनियम 1975(महाराष्ट्र) त्यानुसार वेळोवेळी सुधारीत नियमानुसार वर्षनिहाय व्यवसाय कर कपांत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. व्यवसाय कराचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| वेतन/मानधन | दर |
|---|---|
| 7501 ते 10000 | रु.175/- दरमहा प्रमाणे |
| 10000 पेक्षा जास्त | प्रती महा रु.200/- व फेब्रुवारी मध्ये रु.300/- असे एकूण वार्षिक रु.2500/- |

7) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या अग्रिम रकमेचे समायोजन त्यांच्या मासिक वेतनातून करावे व पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्रमांक: 15) पावती पुस्तकांबाबत :**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्र क्र. व्हीपीएम 2472/12815/सीआर 6/23 दिनांक 31/03/1980 नुसार वसूलीची पावती पुस्तके गटविकास अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करुन, संग्रह नोंदवहीत जमा प्रविष्टी नंतरच उपयोगात आणणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

पावती पुस्तकांची साठा नोंदवहीत नमुना नं. 18 (लेखासंहिता 2011 मधील नमुना-15 ) मध्ये नोंद नसणे, वापरलेल्या व शिल्लक पावती पुस्तकांचा लेखा न ठेवणे, साठा नोंदवहीत पावती पुस्तकांची नोंद नसणे त्यामुळे पावती पुस्तकाद्वारे जमा होणा-या रकमांचा आर्थिक गैरव्यवहार किंवा अपहार होण्याची शक्यता असताना संबंधीत सचिवांनी उपरोक्त नियमानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**परिच्छेद क्रमांक: 16) नमुना नंबर 8,9 व कर आकारणीबाबत व थकीत येणे रकमांच्या वसूलीबाबत :**

सन 2020-21 लेखापरीक्षण वर्षाखेर अहवालासोबत जोडलेल्या थकबाकी पत्रकाप्रमाणे ग्रामनिधी व पाणीपुरवठा करांच्या रकमापोटी खालीलप्रमाणे थकीत रकमा येणे आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | कराची बाब | 31/03/2021 पर्यत थकबाकी रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | घरपट्टी | 3456983 |
| 2 | दिवाबत्ती कर | 48033 |
| 3 | आरोग्य कर | 48904 |
| 4 | सामान्य पाणी पट्टी | 0 |
| 5 | खास पाणी पट्टी | 535880 |
| | एकूण | 4089800 |

वरीलप्रमाणे करांच्या रकमा अद्यापी येणे आहे. म्हणजेच 31/03/2021 रोजी संपणाऱ्या सन 2020-2021 च्या वितीय थकित आहेत. वरीलप्रमाणे आकडेवारी ग्रामपंचायतकडील उपलब्ध अभिलेख्यांवरुन घेणेत आली आहे. मात्र ग्रामपंचायतीकडील नमुना नं.9 व 11 पाहता त्या मध्ये वसुलीचे वार्षिक गोषवारे काढलेले नाहीत. त्यामुळे सर्व वसुल पावत्या नमुना 9 व 11 ला खतवल्याबाबत तसेच खतवलेल्या सर्वच पावत्यांची रक्कम किर्दीस जमा

Scanned with CamScanner

घेतलेबाबत नमुना नं 9 व 11 शी नमुना नं 6 चा मेळ घेता आला नाही. वार्षीक पानावर बेरजा मारुन प्रत्यक्ष पडताळणी मेळ नमुना नं 6 मधील वसुल रकमांशी घेऊन लेखापरिक्षणाची खात्री पटवावी. सबब वरील प्रमाणे थकबाकी योग्य असलेबाबत लेखापरिक्षणामध्ये अभिप्राय देता येत नाहीत.

तसेच वास्तविक महाराष्ट्र ग्रामपंचायत मध्ये नमुद शासन निर्णय 1960 नियम (येणे असलेल्या रककमांबाबत) नुसार लिखीत नियमातील तरतुदीनुसार प्रथम जबाबदार सचिव यांनी ग्रामपंचायत कायदा कलम 1995/3/22 दिनांक (2) 129नुसार मागणी लेखे येणे असणाऱ्यान .या थकबाकिदारारा बजावणे जरुरीचे आहे-नंतर रीट बजावणे जप्ती आहेनुसार जप्तीचे अधीपत्राची कार्यवाही 4 अशा कार्यवाहीनंतरही वसुली न झाल्यास उपरोक्त निर्णयातील नियम जरुरी आहे

वरील रक्कम पाहता जबाबदार सचिव यांनी त्या त्या वर्षात अशी कोणतीही कार्यवाही केलेची लेखापरीक्षणास दिसुन आलेले नाहीमहाराष् .ट्र ग्रामपंचायत कर व फी बाबतचे नियम 1960 चे नियम 124 नुसार पंचायतीने घरे व इमारती व बखळ जागेवर घरपट्टी कर, सामान्य आरोग्य कर व दिवाबती करांची आकारणी केली होती. आकारणी यादीमध्ये अवलोकन करता आढळून आलेल्या उणिवांची पुर्तता करावी.

1. पंचायतीने आपल्या कार्यक्षेत्रात सर्व करपात्र इमारतीच्या नोंदी केलेबाबत प्रमाणपत्र नियम क्रं.4 नुसार नोंदलेले नाही पुर्तता करावी.
2. नियम 17 नुसार दर चार वर्षांनी फेर आकारणी केलेनंतर प्रत्येक वर्षातील करपात्र इमारतीची वाढ व घट विचारात घेवून एकूण मागणी यादीतील संपुर्ण तपशिलासह खुलासेवार नियम 8 नुसार नोंद केलेली नाही. ठरावाच्या आधारे एकूण मागणी निश्चित न केल्याने मागणीच्या रकमा निश्चित करता येत नाहीत.
